# शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग,

१७, डॉ आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१

दूरध्वनी क्र -०२०-२६१२५६९६/२६१२२३१७

ई मेल आय डी क्र dydpune@gmail.com

फॅक्स नं ०२० २६१२२३१७

वेब साइट www.dydepune.com


जा.क्र. शिउसं/प्राथ-२०२/२०१७-१८/ 8048

दिनांक 07 NOV 2017

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद पुणे

**विषय -** सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत

**संदर्भ :** १. शासन निर्णय एसएफएस-१०१७/प्र.क्र.६३०/एसएम-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३२ दि २६.०९.२०१७

२. शासन निर्णय एसएफएस-१०१७/प्र.क्र.६५९/एसएम-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३२ दि २९.०९.२०१७

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, संदर्भीय शासन निर्णय क्रं. १ नुसार मावळ शिक्षण प्रतिष्ठान, तळेगांव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे संचलित श्री पद्मावती विद्या मंदीर, उर्से, ता. मावळ, जि. पुणे या मराठी माध्यमाची शाळा व संदर्भीय शासन निर्णय २ अन्वये श्री प्रगती एज्युकेशन सोसायटी, वाघोली, ता. हवेली, जि. पुणे संचलित पुणे पब्लिक स्कूल कलमबाग, पुणे नगर रोड, वाघोली, ता. हवेली, जि. पुणे या इंग्रजी माध्यमाची नवीन शाळा सुरू करण्याकरिता १ ते ८ अटी व शर्तींच्या अधीन राहून परवानगी दिलेली आहे.

सदर शासन निर्णयातील अट क्रं. १ नुसार सदर संस्थेने विहीत निकषाची व मुदतीची मुदतठेव पावती तसेच संस्थेच्या नावाने एकूण ४० आर. जमिनीबाबतच्या ७/१२ चा अदययावत उतारा/ खरेदी खत/ नोंदणीकृत बक्षिसपत्र किंवा जमीन भाडेकरार (लिज) असल्यास ३० वर्ष कालावधीचा नोंदणीकृत भाडेकरार विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांचे कडे ३ महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे, असे नमूद करण्यात आलेले आहे.

तरी उपरोक्त अटीची पुर्तता विहित वेळेमध्ये संबंधीत संस्थेकडून पुर्ण करून घेऊन या कार्यालयास साद करण्यात यावी.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-०१

**प्रत : माहितीस्तव सविनय सादर**

मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**प्रत : कार्यवाहीस्तव रवाना**

अध्यक्ष/सचिव, श्री प्रगती एज्युकेशन सोसायटी, वाघोली, ता. हवेली, जि. पुणे

अध्यक्ष/सचिव, मावळ शिक्षण प्रतिष्ठान, तळेगांव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे